# करीना थापा ला प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार

## 26 डिसेंबर रोजी राष्ट्रपतींच्या हस्ते दिल्लीत होणार गौरव

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.20 )**- आग लागलेल्या फ्लॅटमध्ये स्वत:ला झोकुन देत सिलिंडर बाहेर काढून जय अंबा अपार्टमेंटच्या 70 कुटुंबांचे रक्षण करणाऱ्या करिना थापाच्या धाडसी वृत्तीची दखल केंद्र सरकारने घेतली आहे. केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालयाने प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी तिची निवड केली आहे. येत्या 26 डिसेंबर रोजी राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रपती भवनात एका नेत्रदिपक समारंभात तिला या मानाच्या राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

धुरांचे लोट, गरम टाईल्स आणि श्वास गुदमरवणाऱ्या स्थितीचा यशस्वी सामना करून आपले अपार्टमेंट आगीपासून वाचविण्याच्या ध्येयाने धाडसाचा परिचय देणाऱ्या करीना थापाचे (वय 17 वर्ष) राष्ट्रीय पुरस्कार जाहीर



झाल्याने सर्वत्र कौतुक होत आहे. समयसूचकता व धाडसाच्या जोरावर तिने सिलिंडरचा स्फोट होण्यापासून थांबवला व भीषण अपघातातून अपार्टमेंटचे रक्षण केले.

### देशासाठी दिलेल्या प्राणांच्या आहुतीचे स्मरण

शिखांचे दहावे गुरू गुरु गोविंद सिंग यांचे पुत्र साहिबजादा जोरावरसिंह आणि साहिबजादा फतेहसिंह यांनी देशासाठी दिलेल्या प्राणांच्या आहुतीचे स्मरण म्हणून 26 डिसेंबर रोजी देशात 'वीर बाल दिवस' साजरा केला जातो. याच औचित्याने केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालयाच्यावतीने प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार प्रदान करण्यात येतात. शौर्य, क्रीडा, समाजसेवा, विज्ञान- तंत्रज्ञान, पर्यावरण, कला व संस्कृती आणि संशोधन क्षेत्रामध्ये कतृत्वाची छाप सोडणाऱ्या भारतातील मुला-मुलींची विविध निकषांच्या आधारे निवड केली जाते. राष्ट्रपतींच्या हस्ते या मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात येते. पदक, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

### 15 मे रोजी घडली होती घटना

कठोरा परिसरातील पोद्दार इंटरनॅशनल स्कुल शेजारील जय अंबा अपार्टमेंटमध्ये 15 मे 2024 च्या सायंकाळी 6.00 वाजता ही दुर्घटना घडली. अपार्टमेंटच्या %बी-विंग% मधील दुसऱ्या माळ्यावरील फ्लॅटमधून धूर निघत असल्याचे दिसताच घरकाम करणाऱ्या करीना थापाने बंद असलेल्या शेजारच्या फ्लॅटचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. मात्र, आग आणि धुराचे लोट येत असतानाही पाण्याच्या बादल्यांचा सतत मारा करत तीने सिलेंडर शेजारील आग पूर्णपणे आटोक्यात आणत सिलेंडर बाहेर काढले. अशात सिलेंडरचा स्फोट कधीही होऊ शकला असता. करीनाच्या समय सूचकतेमुळे मोठा अनर्थ टळला व अपार्टमेंटचे रक्षण झाले. या सर्व घटनाक्रमात धाडस व समयसूचकतेचा परिचय देणाऱ्या करिनाच्या या अनन्यसाधारण कार्याची दखल घेत जिल्हा महिला व बाल विकास विभागाद्वारा जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालयाला पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्यात आला.सर्व निकषांती प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारासाठी तिची निवड झाली.



अमरावती- स्थानिक कंवर नगर परिसरात असलेल्या महानुभाव आश्रमाला 20 नोव्हेंबर रोजी 100 वर्षे पूर्ण झाले आहे. यानिमीत्त महानुभाव पंथाची शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रा सायन्सकोर येथुन बसस्थानक, रेल्वे स्टेशन, राजकमल चौक, राजापेठ चौक ते कंवर नगर आश्रम अशी ही शोभायात्रा काढण्यात आली.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत नर बिबटचा मृत्यू

**वडाळी बिटजवळील नॅशनल हायवेवरील घटना**

**आतापर्यंत चार ते पाच बिबट मृत्यूमुखी**



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.20 )** - अज्ञात वाहनाच्या धडकेत एक नर बिबट मृत्यूमुखी पडला. ही घटना 20 डिसेंबर रोजी वडाळी बिटजवळील नॅशनल हायवेवरील गुणवंत बाबा मंदिरासमोर घडली. गेल्या पंधरा दिवसात रस्ता अपघातात हा दुसरा बिबट दगावला असून, गेल्या काही महिन्यात रस्ता अपघात चार ते पाच बिबटचे मृत्यू झाल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. वन्यप्राण्यांच्या अपघाताच्या घटना वाढल्यामुळे वन्यप्रेमींमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

20 डिसेंबर रोजी वडाळीचे वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या मार्गदर्शनात वनपाल व वनरक्षक हे गस्तीवर होते. दरम्यान त्यांना वडाळी वर्तुळातील उत्तर वडाळी बिट, वनखंड क्र. 4 मधील नॅशनल हायवेच्या बाजूला एक नर बिबट मृत अवस्थेत दिसुन आला. त्यामुळे सदर बिबटचा मृत्यु अज्ञात वाहनाच्या धडकेमुळे झाल्याचे प्रथम दर्शनी दिसुन आले. सदर घटनेची माहिती वनविभागाच्या वरिष्ठ अधिकार्यांना तात्काळ भ्रमणध्वनी द्वारे देण्यात आली. त्यानंतर घटनास्थळी पाहणी करुन वनपरिक्षेत्र अधिकारी व वन वनरक्षका वनपाल यांनी घटनास्थळ पंचनामा नोंदविण्यात आला. या घटनेच्या अनुषंगाने वन गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्यानंतर त्या ठिकाणी पशुधन विकास अधिकारी (प्रयोग शाळा) डॉ. अतुल खेरडे तसेच पशुधन विकास अधिकारी (शल्य चिकात्सालय) डॉ. नितीन पाटणे यांनी पाचारण करून, त्यांनी नर बिबटच्या मृतदेहाची प्राथमिक तपासणी केली. सहाय्यक वनसंरक्षक (कॅम्प व वन्यजीव) तसेच मानद वन्यजीव रक्षक यांच्या उपस्थितीत श्वविच्छेदन करण्यात आले. सदर बिबटचा मृत्यु अंदाजे 8 ते 10 तासापुर्वी झाला असावा तसेच अज्ञात वाहनाच्या धडकेमुळे अंतर्गत रक्त स्त्राव होवून बिबट मृत्यु झाला असल्याचा प्राथमिक अंदाज पशुवैद्यकीय अधिकारी यांनी व्यक्त केला.

### अग्नी देऊन मृत बिबटची विल्हेवाट

सदर बिबटच्या मृतदेहाला लाकडी थप्पीवर ठेवून सर्वा समक्ष नियमानुसार दहन करुन विल्हेवाट पंचनामा नोंदविण्यात आला. यावेळी एसीएफ देसाई, शिंदे, वडाळी वनपरिक्षेत्र अधिकारी वर्षा हरणे, वनपाल बाबुराव खैरकर, वनमजूर किशोर डहाके, वाहन चालक संदीप चौधरी, कैलास इंगळे यांची उपस्थिती होती.

# शिकार प्रकरणातील आरोपीवर कोठडीत अत्याचार नाही!

## उपवनसंरक्षकांचा खुलासा

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.20 )** - परतवाडा वन परिक्षेत्रातील वाघाच्या शिकार प्रकरणी आदिवासी संशयितावर कोठडीत कोणतेही अत्याचार करण्यात आलेले नाही. वास्तविक पाहता नेमराव कासदेकर यांना अटक करण्यापूर्वीच आजार असल्याचे, तसेच ते वन कोठडीत असताना त्यांच्यावर कोणतेही अत्याचार झाले नाहीत, याबाबत उपवनसंरक्षक अग्रीम सैनी यांनी वस्तुस्थितीदर्शक खुलासा केला आहे.

मेळघाट प्रादेशिक वनविभागांतर्गत अंजनगाव परिक्षेत्रातील पांढराखडक वर्तुळ, वस्तापूर बिटमध्ये दि. 26 नोव्हेंबर 2024 रोजी एक वाघ मृत अवस्थेत आढळून आला. याप्रकरणी चौकशीत 9 संशयितांना अटक केली. अचलपूर न्यायालयाने संशयित आरोपींची चौकशीसाठी वनकोठडी दिली. संशयित आरोपींच्या वनकोठडी दरम्यान सर्व संशयित आरोपींची 24 तासाच्या अंतराने अचलपूर येथील उप जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करण्यात आली. नियमित वैद्यकीय तपासणी दरम्यान नेमराव कासदेकर याच्या छातीवर कुठलीही जखम आढळून आली नाही. त्याचप्रमाणे कुठल्याही वैद्यकीय अहवालामध्ये जबरदस्तीने जखम घडवून आल्याचा उल्लेख नाही. वनकोठडी दरम्यान उपजिल्हा रुग्णालयात करण्यात आलेल्या नियमित वैद्यकीय तपासणीमध्ये नेमराव कासदेकर याच्या त्वचेला बुरशीजन्य संसर्ग असून गुप्तांगालाही संसर्ग असल्याचे वैद्यकीय अहवालात नमूद आहे. त्यानुसार उपचार करण्यात आले. वनकोठडीची मुदत संपल्यानंतर न्यायालयीन कोठडीत देताना दि. 18 डिसेंबर 2024 रोजी अमरावती मध्यवर्ती कारागृहात देण्यापूर्वी अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयातही वैद्यकीय तपासणी केली. या तपासणीमध्येही छातीवर जखम असल्याचे नमूद नाही. नेमराव कासदेकर याच्या त्वचेवर संसर्ग असल्याचे अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या वैद्यकीय अहवालात नमूद आहे. संशयितास अमरावती तुरुंग अधिकारी यांच्या ताब्यात देत असताना संशयित आरोपीने शरीराला खाज येत असल्याचे, तसेच जागोजागी त्वचेचे सालपट निघत असल्याचे सांगितले. मध्यवर्ती तुरुगांतील कर्मचारी यांनीही संपूर्ण पाहणी करुनच संशयितास ताब्यात घेतले.

नेमराव कासदेकर याची न्यायालयीन कोठडीत असताना प्रकृती बिघडली आहे. याबाबत त्याच्या नातेवाईकांना तुरुंग प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे. मात्र दि. 20 डिसेंबर 2024 रोजी मारहाण करून छातीवर जखमा केल्याचे आणि गुप्तांगावर चटके दिल्याचे वृत्त पूर्णपणे निराधार आहे, मेळघाट प्रादेशिक वनविभाग उपवनसंरक्षक अग्रिम सैनी यांनी कळविले आहे.

# बडनेरातून चोरलेली दुचाकी सापडली अमरावतीत

## चोराचे दुचाकी सोडून पलायन

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.20 )** - शहर पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये दुचाकी चोरीचे प्रमाण वाढले आहे. गेल्या 5 डिसेंबर रोजी बडनेरावरून चोरी गेलेली एक्टिवा मोपेड दुचाकी जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या महिला होस्टेल समोर उभी असल्याचे आढळून आले आहे. बडनेरा पोलिसांनी 19 डिसेंबर रोजी रात्री ती दुचाकी जप्त केली आहे.

इर्विन रुग्णालयासमोरील होस्टेलसमोर चार ते पाच दिवसांपासून एक दुचाकी उभी होती. या दुचाकीवर नागरिकांना संशय आला. पण दिवस-रात्र रस्त्यावर ही दुचाकी उभी असताना सुद्धा कोणत्याही पोलीस कर्मचाऱ्यांना दिसली नाही. हे विशेष. काही नागरिकांनी उभी असलेली एक्टिवा मोपेड दुचाकीबद्दल माहिती घेऊन बडनेरा पोलीसांना संपर्क केला. त्यानंतर ही दुचाकी बडनेरा पोलीस स्टेशनच्या हद्दीतून 5 डिसेंबर रोजी चोरी गेल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी ती दुचाकी जप्त केली असून, ही एक्टिवा मोपेड दुचाकी क्रमांक एम एच 27 बि डी 47 56 इर्विन चौकामध्ये कुणीतरी उभी केली, याबाबत माहिती बडनेरा पोलीस काढत आहे. पोलिस चोराचा शोध घेत आहे.

### मेट्रो वाईन शॉपसमोरून दुचाकी चोरणारा ताब्यात

16 डिसेंबर रोजी मेट्रो वाईन शॉप जवळून एकाची दुचाकी चोरी गेली होती, ज्याने की गाडी चोरली होती, त्याला पण कोतवाली पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याच्याजवळील दुचाकी जप्त केली आहे. ही कारवाई कोतवाली पोलिस स्टेशनचे पोलिस कर्मचारी रफीक खान व त्यांच्या टिमने केली.

# भरधाव कार व्यापारी संकुलात शिरुन पलटली

## तरुणीसह दोघे जखमी ■ अचानक हॅन्डब्रेक मारल्यामुळे अपघात





**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.20 )** - भरधाव होडा सिटी कारचा हॅन्डब्रेक मारल्यामुळे ती कार नवाथेनगर स्थित रुद्रेश मंगलम येथील व्यापारी संकुलात शिरली आणि उलटली. ही घटना 20 डिसेंबर रोजी पहाटेच्या सुमारास घडली. अपघातात इतका भिषण होता की, कार उलटून पडली होती. सुदैवाने कारमधील हेमांशु सजयराव घोम (23, रा. यडापार, यवतमाळ, ह.मु. आरोग्य हॉस्पीटल, स्वस्तिक कॉलनी) व एक तरुणी असे दोघे किरकोळ जखमी झाले.

हेमांशु घोम हे रिलायन्स कंपनीच्या शोरुममध्ये काम करीत असून, ते 20 डिसेंबर रोजी रात्री त्यांच्या एका मैत्रिणीसोबत एमएच 02 डीझेड 2715 या क्रमांकाच्या होंडा सिटी कारने नागपूर रोडवरील एका हॉटेलमध्ये जेवणाकरिता गेले होते. तेथून परत ते बडनेरा रोडने आपल्या घरी परत जात असताना, नवाथे चौकातील रुद्रेश मंगलम कार्यालयासमोरील गतिरोधकाजवळ हेमांशुने अचानक कारचा हॅन्डब्रेक दाबला. त्यामुळे त्यांची कार भरधाव वेगाने रुद्रेश मंगलमधील व्यापारी प्रतिष्ठानाबाहेरील सिमेंटचे कठडे तोडून आतील पायर्यावर जाऊन उलटली. या अपघातानंतर मोठा आवाज झाल्याने आजुबाजुच्या परिसरातील नागरिक घटनास्थळी धावून गेले. नागरिकांनी कारमधील तरुण-तरुणींना बाहेर काढून तत्काळ रुग्णालयात उपचाराकरिता पाठविले. या घटनेची माहिती राजापेठ पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. या घटनेची तक्रार राजापेठ पोलिसांनी घेतली आहे.

### सकाळी बघ्यांची प्रचंड गर्दी

पहाटे झालेल्या या अपघाताचे दृष्य सकाळच्या सुमारास भयावह होते. सिमेंट व लोखंडी कठडे तुटलेल्या अवस्थेत होते, तर रुद्रेश मंगलम येथील व्यापारी संकुलातील पायर्यावर कार उलटलेल्या अवस्थेत पडून होती. त्यामुळे हा अपघात पाहण्यासाठी बघ्याची प्रचंड गर्दी जमली होती. रस्त्यावरून ये-जा करणारी वाहने थांबवून अपघातग्रस्त कार पाहत होते. त्यामुळे वाहतुक कोंडी निर्माण झाली होती. त्यानंतर दुपारच्या सुमारास क्रेनच्या साहाय्याने कार उचलून सरळ करण्यात आले. त्यानंतर ती कार नेण्यात आली.

रिलायंन्समध्ये काम करणारे युवक-युवती कारमध्ये होते. अचानक नियंत्रण सुटले आणि चालकाने हॅन्डब्रेक लावले आणि स्टेअरींग जाम होऊन कार उलटली. या अपघातात दोघेही सुखरुप आहेत. या घटनेची नोंद घेतली आहे.

**पुनित कुलट,**
**पोलिस निरीक्षक, राजापेठ.**

# माजी महापौर काशिकर, माजी नगरसेवक निस्ताने भाजपात

## प्रविण पोटेंच्या उपस्थितीत झाला पक्षप्रवेश

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.20 )**- विधानसभा निवडणूकीत महायुतीला मिळालेले यश पाहता महाविकास आघाडीमधील पदाधिकारी व कार्यकर्ते महायुतीमधील भाजप, शिवसेनेत जाण्याचा ओघ सुरु आहे. उबाठा शिवसेनेची जिल्ह्यातील एक मोठी फळी शिंदे गटाच्या शिवसेनेत गेल्यानंतर शुक्रवारी उबाठा शिवसेनेच्या माजी नगरसेवक स्वाती निस्ताने व राष्ट्रवादी कॉंग्रेस(शरद पवार गट) चे पदाधिकारी तथा माजी महापौर प्रविण काशिकर यांनी भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश घेतला. भाजपचे शहर अध्यक्ष तथा



माजी आमदार प्रविण पोटे यांच्या उपस्थितीत हा पक्ष प्रवेश पार पडला. यावेळी विविध पक्षाच्या 35 ते 40 पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी भाजप मध्ये प्रवेश घेतला.

### पक्ष प्रवेश नाही, घर वापसी!



सन 1995 मध्ये भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे अध्यक्ष म्हणून आपल्या कार्याला सुरुवात केली. त्यानंतर पक्षाने 1997 मध्ये महापालिका निवडणूकीत उमेदवारी दिली. निवडणूक जिंकली व महापौर झालो. सन 2007 पर्यंत नगरसेवक होतो. त्यानंतर वार्ड महिला राखीव झाला. महिला राखीव असल्याने पत्नीला निवडणुकीत उभे केले मात्र फक्त पन्नास मतांनी त्यांचा पराभव झाला. सन 2010 मध्ये सहकार क्षेत्रात काम केले. एक वर्ष जिल्हा मध्यवर्ती बँकेत उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळली. सध्या जिल्हा मध्यवर्ती बँकेत तज्ञ संचालक म्हणून कार्यरत आहे. अमरावती लोकसभा मतदारसंघ राखीव असल्याने राष्ट्रवादी काँग्रेसमधील काही मंडळींनी माझे नाव पक्षश्रेष्ठीकडे सुचवले होते. त्याचप्रमाणे मी तयारीला सुद्धा लागलो होतो. पवार साहेबांनी माझा विचार केला होता. मात्र महाविकास आघाडीत अमरावती लोकसभेत काँग्रेसला गेल्याने त्यामुळे लोकसभेत निवडणूक लढता आली नाही. विधानसभेत झालेल्या निवडणुकीत अमरावती लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार सुलभा खोडके यांचे काम केले. काम करत असताना भाजपचे प्रेम पुन्हा मनात दाटून आले, त्यामुळेच मी आज भारतीय जनता पक्षात घर वापसी करून प्रवेश केला.

**प्रविण काशिकर, माजी महापौर.**

### लोकाग्रहास्तव निर्णय



प्रभागातील नागरिकांच्या आग्रह होता, म्हणून मी भाजपमध्ये प्रवेश केला. मी सन 2012 ते 2017 दरम्यान नगरसेविका होती. त्या काळात त्यांनी जवळपास 18 कोटींची काम केली. स्वर्गीय अमोल निस्ताने यांचे निधन झाल्यानंतर तो काळ माझ्यासाठी खूप खडतर गेला. त्या दरम्यान शिवसेनेतील कोणीच त्यांना मदत केली नाही. मात्र तरीही मी शिवसेनेसोबत होती. आता प्रभागातील जनतेने मला भारतीय जनता पक्षात प्रवेश करावा अशा सूचना केल्या. त्यामूळे मी प्रवेश केला. शहराध्यक्ष प्रवीण पोटे पाटील यांच्या मार्गदर्शनात भारतीय जनता पक्षात मी चांगल्या पध्दतीने काम करेल.

**स्वाती निस्ताने, माजी नगरसेवक**

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# त्रिशुल रोवण्यावरून अचलपुरात तणाव

## शहरातील बुंदेलपुरा परीसरातील घटना ■ परस्परविरोधी तक्रारीवरून गुन्हा दाखल



**महासागर प्रतिनिधी**

**अचलपुर,( दि.20 )-** अचलपुर शहरातील बुंदेलपुरा भागात 20 डिसेबर सकाळी धार्मिक स्थळावर दोन त्रिशुल रोऊन दगडफेक केल्याची घटना घडली. या घटनेनंतर स्थानिकांनी मोठा जमाव घटनास्थळी केल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अचलपूर पोलीस प्रशासनाने तगडा बंदोबस्त लावून परिस्थितीवर नियंत्रण मिळविले. याप्रकरणात दोन्ही समुदायाकडून परस्परविरोधी तक्रारीवरून एकूण 21 जणांविरोधात विविध कलम अन्वय गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार अचलपूर पोलीस स्टेशनमध्ये वानखडे नामक महिलेने दिलेल्या फिर्यादीत म्हटले की 20 डिसेंबर रोजी धार्मिक स्थळावरील पुतळ्यासमोर गेल्या अनेक दिवसांपासून दोन समाजामध्ये किरकोळ वाद सुरू होता. सकाळी धार्मिक स्थळासमोर दरम्यान दोन त्रिशूल आणि विटा गिट्टी राख असल्याचे काही नां दिसून आले. या घटनेच्या तक्रारीवरून अचलपूर पोलीस स्टेशनमध्ये सनी नामक युवक तसेच इतर 9 जणांविरोधात बीएनएस कलम 298 , 3 (5) सह कलम ॲट्रॉसिटी 3 (1) टी अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्यासोबत दुसऱ्या फिर्यादी मेघा नामक महिलेने अचलपूर पोलीस स्टेशनमध्ये दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की आम्ही पारंपरिक त्या जागी त्रिशूलची नेहमी पूजा करत आलो आहोत. पण लता नामक महिला तसेच इतर 10 लोक येथे पूजा करू नये अशी धमकी दिली व ॲट्रॉसिटी ॲक्ट दाखल करण्याची सुद्धा धमकी देत होते. त्यामुळे त्यांनी खोटी तक्रार दिली आहे. या तक्रारीवरून अचलपूर पोलीसांनी लता नामक महिला व इतर 10 जणांविरुद्ध बी एन एसची कलम 189(2), 351 (2), 352 अन्वय गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

> सध्या परिस्थिती नियंत्रणाखाली असून कोणत्याही अफवावर नागरिकांनी विश्वास न ठेवता शांतता कायदा सुव्यवस्थेसाठी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे.
>
> **शुभम कुमार, अचलपूर उपविभागीय पोलिस अधिकारी.**

### घटनास्थळी पोलिसांचा मोठा ताफा तैनात

सकाळी ही घटना समोर येताच घटनास्थळी नागरिकांची प्रचंड गर्दी होती. अचलपूर पोलीस उपविभागीय अधिकारी शुभम कुमार, अचलपूर नगर परिषदेचे प्रशासक धिरज कुमार गोहाड, अचलपूरचे नायब तहसीलदार अक्षय मंडवे, अचलपुरचे ठाणेदार गजानन मेहत्रे यांच्यासह पोलीस, महसूलचे कर्मचारी उपस्थित होते. एवढी अचलपूर नगरपरिषद प्रशासनाने 20 डिसेंबर रोजी लावण्यात आलेले त्रिशूलही जप्त केल्याची माहिती प्राप्त झाली आहे. यापुढे त्या स्थळी कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी तत्काळ सीसीटिव्ही कॅमेरे लावण्यात आले.

# ठाणाठुनीचा संत्रा प्रक्रीया प्रकल्प ठरताहे दिवास्वप्न

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुन्हा अपेक्षा



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.20 )** - वरुड-मोर्शी विधानसभा मतदार संघातील ठाणाठुनी येथे सन 2018 मध्ये मेक इन इंडिया अंतर्गत जैन इरिगेशन सिस्टम लिमिटेड व कोकाकोला इंडिया तसेच महाराष्ट्र शासन अंतर्गत समान, जास्त करार करण्यात आला होता, त्या अंतर्गत संत्रा प्रक्रिया प्रकल्पाचे उद्घाटन माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे उपस्थित संपन्न झाले होते. त्यानंतर या प्रकल्पाच्या पायाभूत सुविधा करतात शासन स्तरावर कारवाई करण्यात आली होती,परंतु अद्यापही येथे कोणतेही प्रकारची सुविधा उपलब्ध नाही. आता पुन्हा नवनिर्वाचित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून शेतकऱ्यांना अपेक्षा आहे.

हा प्रकल्प अंदाजे सहाशे कोटी रुपये रकमेचा असून या प्रकल्पाची गाळण क्षमता 300 टन प्रति दिवस आहे. प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या 500 ते 600 लोकांना रोजगार या माध्यमातून उपलब्ध होऊ शकतो. या प्रकल्पाकरिता 100 एकर जागा अधिग्रहण करण्यात आली असून सदरील पत्रिका माध्यमे पूर्ण झालेली नाही. त्यामुळे आपल्या विनंती करतो की माझ्या मतदार संघात संत्रा उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असून संबंधित प्रकल्पासंदर्भात आपल्या जालनात बैठकीचे आयोजन करून प्रकारच्या कामाला गती प्रदान करण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांकडून केले जात आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा होणार जंगी सत्कार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.20 )** - भाजपा अमरावती शहर जिल्हा पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आज जनसंपर्क कार्यालयात बैठक संपन्न झाली. यात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांचे अमरावती येथे पहिल्यांदाच आगमन होणार आहे. त्यांच्या जंगी स्वागताच्या तयारीची रुपरेषा आखण्यात आली. तसेच पुढे होणाऱ्या मनपा निवडणुक प्रभाग निहाय चर्चा करण्यात आली. त्याचप्रमाणे भाजपा सदस्य नोंदणी अभियानच्या प्रगतीचा आढावा घेऊन जास्तीत, जास्त सदस्य जोडण्याकरिता आवाहन केले. तसेच भारतीय जनता पार्टी अमरावती मध्ये आज इतर पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी जाहीर पक्ष प्रवेश केला यानिमित्त सर्वांचे भाजपा अमरावती मध्ये स्वागत करत अभिनंदन केले. यावेळी जयंत डेहनकर, शिवराय कुळकर्णी, निवेदिता दीघडे, चेतन पवार, विवेक कलोती, अनिता राज, कौशिक अग्रवाल, गंगा खारकर, लखन राज सह भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# शेतातील कृषी पंप विज पुरवठा सुरळीत करा!

## कनिष्ठ अभियंत्याकडे शेतकऱ्यांचे निवेदन



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, ( दि.20 )-** वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. ओलीत करणेही त्रासदायक ठरत असल्याने शेतकऱ्यांनी लेखी निवेदनात कनिष्ठ अभियंता, म.रा.वी.वी.कं.मर्या.अंजनगाव बारी विद्युत केंद्रात सादर केले व वरील समस्यांवर लवकरात लवकर तोडगा काढून त्या सोडविण्याची मागणी रेटून धरली.

रब्बी हंगामासाठी सर्वत्र पिकांना ओलीताखाली पाणी देणे सुरू असुन वीज वितरण कंपनीकडून देण्यात येणारा विज पुरवठा कमी-जास्त प्रमाणात शेतकऱ्यांला मिळत आहे. ओलीत करताना विजपुरवठा खंडीत होत आहे. असुन शेतकऱ्यांना वेळापत्रकानुसार सहा तास विज पुरवठा सुरळीत मिळत नसल्याने व कृषी पंप पुरवठा वारंवार बंद होत असल्याने विहीरीतील मोटार जळून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. कनिष्ठ अभियंत्यांनी ही वरील समस्यांचे निराकरण करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार असल्याचे सांगून कृषी पंप सुरू असताना वेळोवेळी शट डाऊन, रोहित्रावरील अतिरिक्त भार, खाजगी मजुरांचा हस्तक्षेप, अर्थिक व्यवस्था व कृषी पंपांना विज पुरवठा करतानांच्या समस्या वरिष्ठांकडे पाठपुरावा करून सोडविण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे कनिष्ठ अभियंत्यांनी शेतकऱ्यांना सांगितले.

# उपजिल्हा रुग्णालयात विक्रमी रक्तदान

## 201 रक्तदात्यांनी केला रक्तदानाचा रेकॉर्ड



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी ( दि.20 )-** येथील रक्तदाता संघ व उपजिल्हा रुग्णालय मोर्शीच्या वतीने आज (दि.19 डिसेंबर) रोजी स्थानिक उपजिल्हा रुग्णालय येथे पार पडलेल्या भव्य रक्तदान शिबिरात एकूण 201 रक्तदात्यांनी रक्तदान करून विश्वविक्रम केला.

राज्य संक्रमण परिषदेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार रक्तदात्यांचा टी-शर्ट देऊन सन्मान करण्यात आला. सर्वप्रथम उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. प्रमोद पोतदार व त्यांच्या पत्नी मनीषा पोतदार यांनी सपत्नीक रक्तदान करून रक्तदान शिबिराची सुरुवात केली. दरम्यान या रक्तदान शिबिरात ज्योती तट्टे, मंजुषा वांदे,मेघा झामळे,कोमल भोजने, मुगदा खेरडे, प्रेमा चिखले, मीनाक्षी वघारे, स्नेहल खेरडे, संगीता जैन या महिलांनी रक्तदान करून समाजापुढे एक आदर्श निर्माण केला.

जिल्ह्यात अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले असून अनेक वेळा अपघात झाल्यास रुग्णाला रक्ताची नितांत गरज भासते तसेच शस्त्रक्रिया करतांना रुग्णाला रक्त मिळविण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते. प्रसंगी मोठी किंमत देऊन रक्त विकत आणावे लागते. जिल्ह्यामध्ये रक्तदान शिबिरे कमी होत असल्यामुळे रक्ताचा तुटवडा होत आहे. ही गंभीर समस्या लक्षात घेऊन उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ.प्रमोद पोतदार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

रक्त संकलनासाठी उपजिल्हा रुग्णालयाचे स्वातीताई बुरंगे,शेख युसुफ,विनय शेलुरे, कांचन राऊत,अंकित नेवारे,रेश्मा बहुरूपी, बबलू सय्यद,निलेश शेंद्रे,कृष्णा वाघमारे, बंटी नागले तसेच डॉ. हेडगेवार रक्त संकलन केंद्र नागपूर येथील डॉ. संजीवनी काटकर, प्रवीण पाटील, सुवासिनी घोडाकाळे, सुनिता सहारे, पूजा भांडारकर, प्रियंका बोरकर, प्रियंका तायवाडे, अनुप बिल्लोरकर, ओमप्रकाश बोंडे, उमेश ओंकार उपस्थित होते.

> मोर्शी शहरात रक्तदाता संघ स्थापन झाल्यापासून दीड वर्षात रक्तदान शिबिर आयोजित करून 2 हजार रक्त पिशव्या संकलन करण्यात आल्या. माझ्या 51 व्या वाढदिवसानिमित्त 201 रक्तदात्यांनी रक्तदान केले त्यांचा मी सदैव ऋणी आहे.
>
> **डॉ.प्रमोद पोतदार वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय मोर्शी.**

# मॉर्निंग चषक -2024 टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे थाटात उद्घाटन

## 20 ते 25 डिसेंबर या काळात मॉर्निंग चषक-2024 चे आयोजन ■ जिल्ह्यातील क्रिकेट रसिकांसाठी ठरणार मेजवाणी



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि. 20 )** - शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाध्य भाऊसाहेब देशमुख यांच्या 126 व्या जयंती उत्सवानिमित्त श्री शिवाजी शिक्षण संस्था कर्मचारी व मॉर्निंग क्रिकेट क्लब अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने स्व.श्री उपाध्य दादासाहेब काळमेघ व स्व. प्रशांत उर्फ गोटूभाऊ चांदुरकर, स्व.चैतन्य संतोष रामेकर, स्व.रामभाऊ विठोबाजी ठाकरे, स्व.बेबीताई देविदास भोंड, स्व. मधुकरराव सगणे यांच्या स्मृती प्रित्यर्थ अमरावती शहरातील रुलर इन्स्टिट्यूट क्रीडांगण पंचवटी चौक अमरावती दि.20 ते 25 डिसेंबर 2024 दरम्यान लीग पद्धतीने या स्पर्धेचे मा.श्री हर्षवर्धन देशमुख अध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती तथा उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन तथा श्री संत गाडगे महाराज व डॉ. पंजाबराव उपाध्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेला हाराअर्पण करून उद्घाटन या कार्यक्रमास सुरुवात झाली. या स्पर्धेत प्रथम पारितोषिक 71 हजार, द्वितीय पारितोषिक 51 हजार, तृतीय पारितोषिक 31 हजार व इतर प्रोत्साहनपर बक्षिसे समाविष्ट आहेत.

स्पर्धेचे उद्घाटन दिनांक 20 डिसेंबर 2024 रोजी उद्घाटन संपन्न झाले. यावेळी मंचावर हर्षवर्धन देशमुख कार्यक्रमाध्यक्ष, गजानन पुंडकर उद्घाटक, मा. श्री. हेमंत काळमेघ मार्गदर्शक, सदाशिवराव चिंचे, स्मिता देशमुख, पुनम मोहोड, अभय ढोबळे, गजानन गोसावी, विलास ठाकरे, संदीप देशमुख आदी मंचावर उपस्थित होते. दरवर्षीप्रमाणे यंदाही मॉर्निंग चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा ज्याची विदर्भ तसेच महाराष्ट्रभर चषकाची ख्याती आहे. या स्पर्धेची प्रतीक्षा महाराष्ट्रातील अनेक खेळाडू पाहत असतात अशा उत्कृष्ट टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन निरंतर अखंड सुरू ठेवावे अशी अपेक्षा, श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी यावेळी व्यक्त केली. भाऊसाहेबांच्या विचारांना सार्थक ठरणारे, भाऊसाहेबांनी शिवाजी शिक्षण संस्था पूर्वी शिवाजी व्यायाम मंडळाची स्थापना केली होती आपल्या या मैदानांवरून एखादा मिल्खा सिंग, ध्यानचंद तयार व्हावा अशी त्यांची इच्छा होती त्यांच्या स्वप्नांना पूर्ण करण्यासाठी मॉर्निंग क्रिकेट क्लबचे आयोजन सार्थक ठरत आहे. मॉर्निंग क्लबने या स्पर्धेत सातत्य ठेवत अखंड अशा स्पर्धांचे आयोजन करावे, असे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे सदस्य हेमंत काळमेघ यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाला वेलकम ग्रुप जेष्ठ मंडळ अमरावती व मॉर्निंग क्रिकेट क्लबचे सर्व सदस्य यावेळी उपस्थित होते.

# राज्यातील मेंढपाळांच्या समस्या सोडविण्याचे मुख्यमंत्र्यांपुढे आव्हान!

## ■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना दिले निवेदन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.20 )-** राज्यातील मेंढपाळांच्या समस्या सोडविण्याचे मोठे आव्हान फडणवीसांपुढे असून राज्यातील मेंढपाळ बांधवांनी नुकतेच देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन मेंढपाळांच्या समस्यांवर तोडगा काढण्याची विनंती केली आहे.

शेळी-मेंढी पालन करून मेंढपाळांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. पशुपालनाशिवाय दुसरे कोणतेही उदरनिर्वाहाचे ठोस साधन नाही अश्या विपरीत परिस्थितीत आणि वाढत्या महागाईमध्ये मेंढपाळ बांधव शेळी मेंढी पालन करत असून या सर्व महागाईचा व शासनाच्या कुटील धोरणाचा फटका मेंढपाळांना बांधवांना बसत आहे. शेळी मेंढीच्या आरोग्याचा तसेच विमा कवच देऊन त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आजही ऐरणीवर असून यामध्ये मात्र राज्य शासन कुचकामी ठरत आहे. मेंढपाळांना आजही घरकुल योजनेचा लाभ नाही किंवा त्यांच्या पाल्यांना कोणत्याही शैक्षणिक सुविधा किंवा वसतिगृहाचा लाभ देखील मिळत नाही. भारताचे नागरिक असून सुद्धा केवळ मतांपुरता आमचा उपयोग घेतला जात असल्याचा आरोप मेंढपाळ बांधवांनी केला आहे.याशिवाय आपल्या निवेदनात मेंढपाळ बांधवांनी बाहेर राज्यातील कायम स्थानांतरित मेंढपाळांना चराईबंदी करण्यात यावी, जेणे करून त्यांच्यापासून होणाऱ्या रोग-राईपासुन पशुंचा बचाव होईल, भारतीय वन कायदा 1927 अन्वये बंदी घातलेले वनराई अधिकार उठवावे, शेळया मेंढ्यांच्या आकस्मिक मृत्यूची नुकसान भरपाई मिळावी, मेंढपाळ समुहाला वन हक्क अधिनियम 2006 अंतर्गत चराई करीता कुरणे विकास धोरणे राबविण्यात यावे, मेंढपाळ बांधवा वरील अन्याय थांबून खोटया केसेस मागे घेण्यात याव्या, मेंढपाळ बहुल तालुक्यात शेळया मेंढयाचे मोबाईल हॉस्पीटल तयार करण्यात यावे, नैसर्गिक आपत्ती पासून संरक्षणा करीता मेंढपाळ कुंटुबांना अत्याधुनिक तंबू, साहीत्य, औषध वितरीत करण्यात यावे. मेंढपाळ बांधवांच्या शेळयामेंढ्याचा 1 रुपया प्रमाण विमा कवच उपलब्ध करुन दयावे, अमरावती विभागात पशूनिहाय पशुगणना करावी, मेंढपाळ बांधवांच्या संपूर्ण शेळया मेंढयाचे दर तीन महिन्यांनी आरोग्य तपासणी करण्यात यावी, शासनाने ठरवून दिलेल्या कालावधीत आजारनिहाय शेळी-मेंढी लसीकरण शिबीरे आयोजीत करण्यात यावे,मेंढपाळाच्या मुलांसाठी वसतीगृह निर्मीती करणे व चांगल्या शैक्षणीक सुविधा द्याव्यात, मेंढपाळांना विशेषबाब म्हणून घरकुल उपलब्ध करून स्थायी निवारा देण्यात यावा,आंतरराज्यीय सिमेवर असणारे पशुसंवर्धन विभागाचे तपासणी नाके (चेकपोस्ट) वरील झालेल्या कार्यवाहीचा मागील दोन वर्षाचा वस्तुनिष्ठ अहवाल याबाबत पाठपुरावा करावा अश्या मुख्य मागण्या मेंढपाळ बांधवांनी केलेल्या आहे. मेंढपाळांच्या निवेदनाची गांभीर्याने 8 दिवसाच्या आत दखल घेऊन योग्य कार्यवाही न केल्यास विभागीय आयुक्त कार्यालयासमोर 'वाडा आंदोलन' करण्याचाइशारा सुद्धा यावेळी मेंढपाळ बांधवांनी दिला आहे.

# अंजनगावात सोमनाथ सुर्यवंशी यांना भावपूर्ण श्रध्दांजली




**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, ( दि.20 )** - परभणी येथे भारतीय संविधानाची प्रतिकृती ची तोडफोड करणाऱ्याला अटक करा या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या सोमनाथ सुर्यवंशी यांना पोलीस कोठडीत संशयास्पद मुत्यु झाला होता. अंजनगावात सोमवंशी यांना श्रध्दांजली देवून आरोपीवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

या घटनेची सी.आय.डी.च्या मार्फत चौकशी करून दोषींवर कारवाई करावी अशी मागणी जनतेकडून होत आहे. तसेच शहिद सोमनाथ सुर्यवंशी यांना अंजनगाव सुर्जी तालुक्यातील व शहरातील नागरिकांनी तसेच समता सैनिक दलाच्या वतीने अंजनगाव सुर्जी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात महास्थवीर पुज्य भदंत सुमंगल याच्या प्रमुख उपस्थितीत भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यावेळी संभाजी ब्रिगेड चे प्रदेश प्रवक्ते प्रा. प्रेमकुमार बोके,आंबेडकरी चळवळीतील लोकनेते व माजी बसपा जिल्हाध्यक्ष प्रा. बा. पा. हेरोळे, बहुजन ओबीसी आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रविण पेटकर, चंदा निलेश इंगळे, पत्रकार प्रेमदास तायडे,रमेश सावळे, यांनी 'शहिद सोमनाथ सुर्यवंशी अमर रहे' अशी आपल्या शब्दातून श्रध्दांजली अर्पण केली. यावेळी कार्यक्रम ला उपस्थित समता सैनिक दलाचे जिल्हा संघटक सिध्दार्थ सावळे, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक समिती संयोजक तेजस अभ्यंकर, सोमेश इंगळे, विजय रायबोले,सुरज पवार, बाळासाहेब गोंडचोर, बाबाराव खोब्रागडे, सुनील राक्षसकर,बाळासाहेब आठवले, संघरतन सरदार, किरण वानखडे, दादू रतन इंगळे,अमोल हेरोळे, पंकज वारुळे,रोशन इंगोले, रत्नदिप रायबोले,आकाश वानखडे, देवानंद तायडे,पत्रकार मनोज मेळे, रविंद्र वानखडे,सह अनेक शेकडो संविधानवादी व लोकशाही हितवादी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.